# प्रसिध्दी पत्रक

**श्री. राजेंद्र धन्नु किर्तीकर, वय ५३ वर्षे, पद पोलीस हवालदार ब.नं. ३६९, नेमणुक पोलीस स्टेशन बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण हे १,५००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. राजेंद्र धन्नु किर्तीकर, वय ५३वर्षे, पद पोलीस हवालदार ब.नं. ३६९, पोलीस स्टेशन बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण, रा. धनश्री कॉलनी, मयुर पार्क, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १९/०८/२०१८ रोजी पोलीस स्टेशन बिडकीन औरंगाबाद येथे |
| लाचेची रक्कम | :- | १,५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | दाखल एन.सी. मध्ये प्रतिबंधक कारवाई न करण्यासाठी. |

यातील तक्रारदार हे व्यवसायाने व्यापारी असुन त्यांच्या आई, बहिण, भाचा व पुतण्या यांचे शेजारी राहणारे कुंटुबाशी आपसात भांडण झाल्याने दोन्ही पक्षाविरुध्द पोलीस स्टेशन बिडकीन येथे परस्पर विरोधी एन.सी दाखल आहे. त्याअनुषंगाने तक्रारदार यांचे आई, बहिण, भाचा व पुतण्या यांच्यावर प्रतिबंधक कार्यवाही न करण्यासाठी एन.सी. मध्ये पुढील कार्यवाही करणारे श्री. किर्तीकर, पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन बिडकीन यांनी तक्रारदार यांच्याकडे २,०००/- रु लाचेची मागणी केली व तुम्ही लाच रक्कम न दिल्यास तुमचे विरुध्द पैठण येथे तहसील कार्यालयात प्रतिबंधक कार्यावाही करीता रिपोर्ट पाठवीन असे सांगीतले. तक्रारदार यांची श्री. राजेंद्र किर्तीकर पोलीस हवालदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १८/०८/२०१८ रोजी श्री. राजेंद्र धन्नु किर्तीकर, वय ५३वर्षे, पद पोलीस हवालदार ब.नं. ३६९, पोलीस स्टेशन बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती १,५००/- रुपयाची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१९/०८/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. राजेंद्र धन्नु किर्तीकर, वय ५३वर्षे, पद पोलीस हवालदार ब.नं. ३६९, पोलीस स्टेशन बिडकीन, औरंगाबाद ग्रामीण यांनी पंच साक्षीदारा समक्ष १,५००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस स्टेशन बिडकीन औरंगाबाद येथील आवारात स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

नितीन देशमुख
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद सत्यमेव जयते